Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on :24/08/2019** Notice No. 100

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१९—२०२०

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०१९ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीचे आणि नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन मागविण्यात येत आहे. नविन मंजुरीसाठी केंद्र शासनाकडून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**केंद्र शासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत www.scholarship.gov.in या वेबसाईटवर करावेत.**

**<u>किमान पात्रता व अटी :</u>**

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराचे/त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बॅंक खात्यामध्ये केंद्र शासनाच्या कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेत खाते उघडून त्यासंदर्भातील सर्व माहिती भरने आवश्यक आहे.

६. खाते क्रमांक व इतर बॅंक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बॅंक खाते क्रमांक संपूर्ण अंक टाकावेत व जॉईंट खाते नसावे. स्टेट बॅंक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शून्य रकमेवर बॅंक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसुल केली जाईल.

- <u>शिष्यवृत्ती नविन/ नूतनीकरण (Renewal)</u> अर्ज करण्याची कार्यपध्द्ती.

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नवीन मंजुरीसाठी व नूतनीकरणासाठी **<u>www.scholarships.gov.in</u>** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्द्तीने ३१/१०/२०१९ पर्यंत अर्ज करने आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. नविन अर्ज भरताना इ. १२ वीची गुणपत्रिका व राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका—याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडने आवश्यक आहे.

४. नविन मंजुरीसाठी **<u>www.dhepune.gov.in</u>** या संकेतस्थळावर मेरीट लिस्ट प्रसिध्द् करण्यात आली असून अशाच विद्यार्थ्यांनी नविन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत.

५. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व राष्ट्रीयकृत बॅंक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

६. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बॅंक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

७. अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रत (हार्ड कॉपी)आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

८. अर्ज भरताना विद्यार्थ्यांना काही अडचन/शंका असतील तर महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागाच्या मदतीने आपल्या अडचणी दूर करुन घ्याव्यात.

## नवीन/नूतनीकरनाच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो).

२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१९ गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

३. राष्ट्रीयकृत बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांकाची नोंद आहे त्याची प्रत.

४. आधारकार्डाची प्रत व आधार कार्ड सिडींग स्लीप.

५. प्रवेश चलनाची झेरॉक्स.

६. बोनाफाईड.

७. पालकांचा मा. तहसिलदारांचा सन २०१८–१९ चा उत्पन्नाचा दाखला.

**नवीन व नूतनीकरण ऑनलाईन मंजूरीचे अर्ज** दि. ३१/१०/२०१९ पर्यंत परिपूर्ण रित्या आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयात स्कॉलरशिप विभागात सादर करणे आवश्यक आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य